# संस्कृती, सर्जनशीलता आणि डिजिटल बाजार

**प्रा. देवानंद एन. कांबळे**
श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज, नागपूर
Email id - dewanandkamble13@gmail.com
Mob No.9921859918

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i1.69

---

***सारांश :***

*आधुनिक काळातील संस्कृती, सर्जनशीलता आणि डिजिटल बाजार यांच्यातील परस्परसंबंधांचा सखोल अभ्यास करतो. जागतिकीकरण, माहिती-तंत्रज्ञान, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे मानवी जीवनशैलीत मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. कला, साहित्य, संगीत, चित्रपट, नृत्य, हस्तकला, आणि डिझाईन, फॅशन आणि इतर सर्जनशील क्षेत्रांना डिजिटल माध्यमांमुळे नवे व्यासपीठ मिळाले आहे. पारंपरिक संस्कृती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम घडून येत असून त्यातून नव्या प्रकारची सांस्कृतिक अर्थव्यवस्था निर्माण झाली आहे.*

*डिजिटल बाजारामुळे कलाकार, लेखक, कारागीर आणि उद्योजकांना थेट ग्राहकांशी जोडले जाण्याची संधी मिळाली आहे. ई-कॉमर्स, ओटीटी प्लॅटफॉर्म्स, सोशल मीडिया मार्केटिंग, ऑनलाइन गॅलरी आणि डिजिटल स्टोअर्स यांच्या माध्यमातून सर्जनशील उत्पादने जागतिक स्तरावर पोहोचत आहेत. यामुळे रोजगारनिर्मिती, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सक्षमीकरणास चालना मिळाली आहे. विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील कारागिरांना डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे नवीन बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.*

*मात्र, डिजिटल बाजारामुळे काही गंभीर आव्हानेही निर्माण झाली आहेत. सांस्कृतिक वस्तूंचे अतिव्यावसायिकीकरण, नकल, बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघन, अल्गोरिदमवर आधारित प्रसिद्धी, मोठ्या कंपन्यांचे वर्चस्व आणि स्थानिक मूल्यांचे क्षीण होणे ही प्रमुख समस्या आहेत. यामुळे अनेक वेळा मूळ कलाकार आणि निर्माते आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल ठरतात.*

*डिजिटल बाजाराचा संस्कृती व सर्जनशीलतेवर होणारा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम विश्लेषित करण्यात आला आहे. संतुलित धोरणे, शाश्वत विकास, सांस्कृतिक संवर्धन आणि नैतिक डिजिटल व्यवहार यांच्या माध्यमातून या क्षेत्राचा समतोल विकास शक्य आहे, असा निष्कर्ष या अभ्यासातून काढण्यात आला आहे.*

**कीवर्ड :** डिजिटल बाजार, ई-कॉमर्स, सोशल मीडिया, सांस्कृतिक अर्थव्यवस्था, जागतिकीकरण, सर्जनशील उद्योग

**प्रस्तावना :**

२१व्या शतकात डिजिटल क्रांतीमुळे मानवी समाजात आमूलाग्र परिवर्तन घडून आले आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड तंत्रज्ञान आणि सोशल मीडिया यांमुळे माहितीचा प्रसार अतिशय वेगाने होत आहे. या बदलांचा प्रभाव केवळ अर्थव्यवस्थेवरच नव्हे तर संस्कृती, परंपरा आणि सर्जनशीलतेवरही पडलेला दिसून येतो.

पूर्वी कलाकार आणि कारागीर स्थानिक बाजारपेठांवर अवलंबून होते. त्यांच्या उत्पादनांची विक्री मर्यादित क्षेत्रातच होत असे. मात्र आज डिजिटल माध्यमांमुळे त्यांच्या कलेला जागतिक व्यासपीठ प्राप्त झाले आहे. यूट्यूब, इंस्टाग्राम, फेसबुक, अमेझॉन, एट्सी, फ्लिपकार्ट यांसारख्या प्लॅटफॉर्म्समुळे सर्जनशील व्यक्तींना स्वतःचा ब्रँड तयार करता येतो. आणि त्याची व्यावसायिकरण मोठ्या प्रमाणात समाजात केल्या जाते. आपला समाजातील सन व्यवहारांची सुद्धा आज आपल्याला बाजारीकरण झालेले दिसते आहे. कारण पूर्वीचे सण समारंभ विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेवून केला जात होते परंतु आज त्याला बाजारीकरणाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे

डिजिटल बाजार ही केवळ आर्थिक संकल्पना नसून ती एक सामाजिक-सांस्कृतिक प्रक्रिया आहे. यातून संस्कृतीचे व्यापारीकरण, आधुनिकरण आणि पुनर्रचना होत आहे. त्यामुळे या विषयाचा समाजशास्त्रीय आणि आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**उद्दिष्टे :**

1. संस्कृती आणि सर्जनशीलतेवर डिजिटल बाजाराचा प्रभाव अभ्यासणे.
2. डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक संधींचे विश्लेषण करणे.
3. स्थानिक कलाकार व कारागिरांवर होणारा परिणाम समजून घेणे.
4. डिजिटल बाजारातील समस्या व आव्हाने ओळखणे.
5. सांस्कृतिक संवर्धनासाठी धोरणात्मक उपाय सुचवणे.
6. ग्रामीण व शहरी सर्जनशील उद्योगांची तुलना करणे.

**गृहितकृत्य :**

1. डिजिटल बाजार सर्जनशीलतेला चालना देतो.
2. ऑनलाइन माध्यमांमुळे सांस्कृतिक उत्पादनांचा प्रसार वाढतो.
3. स्थानिक संस्कृतीला जागतिक ओळख मिळते.
4. व्यावसायिकीकरणामुळे सांस्कृतिक मूल्यांवर परिणाम होतो.
5. डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे रोजगारनिर्मिती वाढते.

**संशोधन पद्धती :**

संशोधन पद्धतीची निवड करत असताना विषय लक्षात घेऊन मिश्र पद्धतीचा म्हणजे वर्णनात्मक

संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**प्राथमिक माहिती :**

- कलाकार, कारागीर व उद्योजकांच्या मुलाखती,
- प्रश्नावली,क्षेत्रीय निरीक्षण

**दुय्यम माहिती :**

- मराठी, हिंदी व इंग्रजी पुस्तके
- संशोधन जर्नल्स,शासकीय अहवाल,ऑनलाइन डेटाबेस
- गुणात्मक पद्धतीद्वारे अनुभव, भावना व सामाजिक परिणामांचा अभ्यास करण्यात आला. संख्यात्मक पद्धतीद्वारे उत्पन्न, विक्री आणि वापरकर्त्यांची संख्या यांचे विश्लेषण करण्यात आले.

**चर्चा :**

दैनंदिन व्यवहारात संस्कृती या शब्दाचा उपयोग आपण करीत असतो सुशिक्षित व्यक्ती ही सुबुद्ध किंवा सुसंस्कृत मानल्या जाते तर अशिक्षित  व्यक्ती या अबुद्ध किंवा असंस्कृत असते असे मानले जाते. त्याचप्रमाणे उच्च समाजाची संस्कृती उच्च असते तर  दर्या खोऱ्यात राहणारा समाज हा संस्कृती हीन असतो असा लोकांचा समज आहे. प्रत्येक व्यक्तीची त्याच्या समाजानुसार एक विशिष्ट संस्कृती असते आणि प्रत्येक व्यक्ती आपल्या संस्कृतीनुसार आपले जीवन जगत असते. संस्कृती शिवाय मानव समाजाची कल्पनाच करता येत नाही. संस्कृती मानवी समाजाचा अविभाज्य भाग आहे पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीमध्ये मानव हा एक असा प्राणी आहे की ज्याने आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग करून स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण अशी संस्कृती निर्माण केली आहे  मानव हा एक सामाजिक प्राणी आहे असे  ॲरिस्टोटल म्हटले  आहे. व्यक्तीच्या आंतरक्रिया मधूनच संस्कृतीची निर्मिती झाली आहे विशेष म्हणजे व्यक्ती सामाजिक आंतरक्रिया मधूनच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपात संस्कृती शिकत असतो म्हणजे व्यक्तीला संस्कृती ही जन्मता प्राप्त होत नाही जन्मानंतर व्यक्ती प्रथम कुटुंबातून नंतर समाजातील लोकांच्या संपर्कातीवर आंतरक्रियांच्या माध्यमातून संस्कृती शिकत असते म्हणून संस्कृती हा एक शिक्षित वर्तन व्यवहार आहे संस्कृती मानवी समाजाचे एक अविभाज्य अंग आहे.

जगातील संपूर्ण मानव समाजाची संस्कृती ही एकसारखी आढळतात नाही. कारण समाज आणि प्रदेश परत्वे लोकांचे ज्ञान, विश्वास, मूल्य व प्रमाणके प्रश्न चिन्ह यात विविधता आढळते त्यामुळे त्यांच्या संस्कृतीमध्ये देखील फरक  आढळून येतो. थोडक्यात संस्कृती मानवनिर्मित असून ती व्यक्तीला शिकावी लागते समाजाचा एक सदस्य या नात्याने ज्ञान विश्वास परंपरा, नियम, कायदे इत्यादी गोष्टी व्यक्ती संपादित करते त्यामुळे संस्कृती हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असते. तसेच संस्कृती ही अमूर्त. संस्कृतीचे दोन प्रकार एक भौतिक संस्कृती दुसरा अभौतिक संस्कृती भौतिक संस्कृती हे डोळ्यांना दिसते आणि अभौतिक संस्कृती ही डोळ्यांना

दिसत नाही पण विचारांना आकलन होते. संस्कृतीमधील विश्वासांचा लोकांवर फार मोठा प्रभाव असतो लोक संस्कृतीतील विश्वासांना खरे मानून त्यानुसार आचरण करतात संस्कृतीमधील विश्वासानुसार व्यक्तींनी आचरण करावे अशी समाजाची अपेक्षा असते जे लोक संस्कृतीमध्ये विश्वास मानत नाहीत आणि त्यानुसार आचरण करीत नाहीत अशा लोकांचे आचरण हे संस्कृती विरोधी मानले जाते अशा लोकांना नास्तिक म्हटले आहे.

सर्जनशीलता म्हणजे नवनवीन गोष्टी शिकण्याची शैली आत्मसात करणे व्यक्तीच्या स्वतःच्या सुप्त गुणांचा विकास होणे नवनवीन कौशल्याचा उपयोग करणे अशा प्रकारच्या माध्यमातून सर्जनशीलतेला महत्त्व प्राप्त होत असते. आज सर्जनशीलतेला खूप महत्त्व प्राप्त झालेले आहे. मधल्या काळात आणि आजच्या आधुनिक युगात ज्याच्या अंगी सुप्त गुण आहे. आपल्या विचारांना, आपल्या वस्तूला, गुणांना, बाजारात कसे मांडायचे याचे कौशल्य ज्याच्या अंगी असते ते चांगले मार्केटिंग करू शकतो. बाजारीकरणाच्या माध्यमातून व्यावसायिकरण योग्य प्रमाणे करणे आवश्यक आहे.

डिजिटल बाजारामुळे सर्जनशील उद्योगांचा झपाट्याने विस्तार झाला आहे. ओटीटी प्लॅटफॉर्म्समुळे चित्रपट व वेब सिरीज उद्योगाला नवे स्वरूप मिळाले आहे. संगीत क्षेत्रात स्ट्रीमिंग अप्समुळे कलाकारांना थेट उत्पन्न मिळू लागले आहे. हस्तकला व पारंपरिक वस्तूंना ई-कॉमर्समुळे नवे ग्राहक मिळाले आहेत.

ग्रामीण भागातील महिला बचतगट, स्वयंरोजगार गट आणि लघुउद्योजक डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करत आहेत. यामुळे त्यांचे आर्थिक स्वावलंबन वाढले आहे. ‘मेक इन इंडिया’ आणि ‘डिजिटल इंडिया’ या उपक्रमांमुळे सर्जनशील उद्योगांना प्रोत्साहन मिळाले आहे.

मात्र, अल्गोरिदम आधारित प्रसिद्धीमुळे काही मोजकेच निर्माते अधिक लोकप्रिय होतात. लहान कलाकारांना पुरेशी संधी मिळत नाही. कॉपीराइट उल्लंघन, पायरेसी आणि बनावट उत्पादनांचा प्रसार ही मोठी समस्या आहे.

तसेच, जागतिक संस्कृतीच्या प्रभावामुळे स्थानिक परंपरा आणि भाषा दुर्लक्षित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे सांस्कृतिक विविधतेवर धोका निर्माण होत आहे.

**निष्कर्ष :**

संस्कृती, सर्जनशीलता आणि डिजिटल बाजार यांचा परस्परसंबंध आधुनिक समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. डिजिटल माध्यमांमुळे सर्जनशीलतेला नवे आयाम मिळाले असून रोजगारनिर्मिती, आर्थिक विकास आणि सांस्कृतिक प्रसाराला चालना मिळाली आहे.

मात्र, व्यावसायिकीकरण, सांस्कृतिक एकसारखेपणा आणि बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघन ही आव्हाने गंभीर आहेत. त्यामुळे शासन, खासगी संस्था आणि समाज यांनी एकत्रितपणे संतुलित धोरणे राबविणे आवश्यक आहे. स्थानिक संस्कृतीचे जतन, कलाकारांचे संरक्षण आणि नैतिक डिजिटल व्यवहार यांवर भर देणे गरजेचे आहे.

भविष्यात डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने सर्जनशील उद्योगांचा शाश्वत विकास साधता येईल, असा

निष्कर्ष या संशोधनातून काढण्यात येतो

**संदर्भ :**


- कुलकर्णी, ए. बी. *भारतीय संस्कृती आणि समाज*. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 2019.
- गुप्ता, कमल. *वैश्विकरण और संस्कृती*. प्रभात प्रकाशन, 2018.
- जोशी, एम. आर. *माध्यम समाजशास्त्र*. साकेत प्रकाशन, 2021.
- देशपांडे, जी. पी. *संस्कृतीचे समाजशास्त्र*. डायमंड पब्लिकेशन, 2018.
- देशमुख, आर. ए. *सांस्कृतिक अध्यापन*. विद्या प्रकाशन, 2018.
- पाटील, एस. आर. *समाज आणि माध्यमे*. मेहता पब्लिकेशन, 2020.
- मिश्रा, प्रदीप. *रचनात्मक उद्योग*. ज्ञान प्रकाशन, 2020.
- वर्मा, सुरेश. *डिजिटल मीडिया और बाजार*. साहित्य भवन, 2021.
- शर्मा, रमेश. *संस्कृती और समाज*. राजकमल प्रकाशन, 2019.
- साठे, आर. एन. *लोक संस्कृती आणि समाज*. ग्रंथाली, 2016.
- Appadurai, Arjun. *Modernity at Large*. University of Minnesota Press, 1996.
- Castells, Manuel. *The Rise of the Network Society*. Blackwell, 2010.
- Flew, Terry. *The Creative Industries*. Sage, 2012.
- Flew, Terry, et al. "Cultural Policy and Creative Industries." *International Journal of Cultural Policy*, vol. 21, no. 3, 2015, pp. 234-49.
- Hesmondhalgh, David. *The Cultural Industries*. Sage, 2019.
- Hesmondhalgh, David, and Sarah Baker. "Creative Labour." *Media, Culture & Society*, vol. 32, no. 1, 2010, pp. 1-17.
- Howkins, John. *The Creative Economy*. Penguin, 2001.
- Throsby, David. *Economics and Culture*. Cambridge University Press, 2001.
- UNCTAD. *Creative Economy Outlook*. United Nations, 2022.
- UNESCO. *Creative Economy Report*. UNESCO, 2013.